**L. A. BILL No. XXX OF 2026.**

A BILL

TO AMEND THE BHARATIYA NYAYA SANHITA, 2023, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३०.**

**भारतीय न्याय संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

२०२३ चा ४५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, भारतीय न्याय संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

१. या अधिनियमास, भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एच ३५५७–१ (८४०–३-२०२६)

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ७२ ची सुधारणा.

२. भारतीय न्याय संहिता, २०२३ (यात यापुढे, जिचा निर्देश, "उक्त संहिता" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्या कलम ७२ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "कलम ७१" या मजकुरानंतर, "किंवा कलम १२४" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २०२३ चा ४५.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

३. उक्त संहितेच्या कलम ७५ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील,-

(एक) खंड (चार) मधील, "शेरेबाजी करणे." या मजकुरानंतर, ";किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (चार) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील:-

"(पाच) जे कामुक किंवा अश्लील स्वरूपाचे असेल अशा रीतीने, दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे, समाजमाध्यम व्यासपीठाद्वारे किंवा संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) किंवा डिजिटल मार्गाने क्षोभकारी संभाषण करणे ; किंवा

(सहा) महिलेच्या संमतीने किंवा संमतीविना कोणत्याही लैंगिक कृतीतील तिच्या सहभागासह, त्या महिलेच्या शरीराच्या कोणत्याही भागाची, वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) किंवा इतर कोणत्याही स्वरूपाच्या माध्यमामार्फत वास्तविक किंवा बनावट वर्णनाचा समावेश असलेली कोणतीही छायाचित्रे, ध्वनीफित किंवा चलचित्रफित टाकण्याची (अपलोड) किंवा प्रसारित करण्याची धमकी देणे ; किंवा

(सात) महिलेची बदनामी करण्यासाठी किंवा तिचा दुर्लौकिक करण्यासाठी कोणत्याही स्वरूपातील सामाजिक वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) माध्यमाचा किंवा इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करणे ; किंवा

(आठ) महिलेचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विनयभंग होईल किंवा तिच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशाप्रकारे तिच्या नावाचा, तपशिलांचा, छायाचित्रांचा किंवा इतर कोणत्याही ओळख साधनांचा वापर करणे.";

(२) पोट-कलम (२) मधील, "खंड (तीन)" या मजकुरानंतर, " किंवा खंड (पाच) किंवा खंड (सहा) किंवा खंड (सात) किंवा खंड (आठ)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याच्या प्रकरण पाच मधील कलमे ६३ ते ९९ मध्ये, महिलांच्या व बालकांच्या विरोधातील अपराधांची आणि त्यासाठीच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. राज्यातील महिलांचे संरक्षण व सुरक्षा करण्यासाठी, उक्त संहिता, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्या विवक्षित कलमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

**२.** उक्त संहितेच्या प्रस्तावित सुधारणा पुढीलप्रमाणे आहेतः-

(एक) उक्त संहितेच्या कलम ७२ मध्ये, विवक्षित लैंगिक अपराधांना बळी पडलेल्या व्यक्तींची ओळख उघड केल्याच्या अपराधांसाठी आणि त्यासाठीच्या शिक्षेसाठी तरतूद केलेली आहे. उक्त संहितेच्या कलम १२४ मध्ये, ॲसिडचा वापर करून स्वेच्छापूर्वक जबर दुखापत करण्याच्या अपराधांसाठी शिक्षेची तरतूद केलेली असून या अपराधाचा, कलम ७२ मध्ये समावेश केलेला नाही. म्हणून, कलम ७२ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या व्यक्तीची ओळख उघड केल्याबद्दल शिक्षेची तरतूद करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

(दोन) उक्त संहितेच्या कलम ७५ मध्ये, लैंगिक छळवणुकीचे अपराध ठरणाऱ्या विविध कृत्यांचे वर्णन केलेले आहे. ई-मेलचा, समाजमाध्यम व्यासपीठाचा वापर करून किंवा क्षोभकारी संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) किंवा डिजिटल मार्गाने क्षोभकारी संभाषण करून, कोणतेही छायाचित्र, ध्वनीफित किंवा चलचित्रफित, इत्यादी टाकण्याची (अपलोड) किंवा प्रसारित करण्याची धमकी देऊन केलेल्या लैंगिक छळवणुकीच्या कृत्यांचा उक्त कलम ७५ मध्ये समावेश केलेला नाही. उक्त संहितेच्या कलम ७५ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, लैंगिक छळवणुकीच्या अशा कृत्यांचा समावेश करणे आणि त्यासाठी शिक्षेची तरतूद करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

**३.** उक्त संहितेद्वारे निरसित केलेल्या, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) मध्ये, शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० (२०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१) याद्वारे, सुधारणा करण्याचे प्रस्तावित केलेले होते. वर निर्दिष्ट केलेल्या तरतुदींचा उक्त संहितेमध्ये अंतर्भाव केलेला नसल्याने, या सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक २४ मार्च, २०२६. मुख्यमंत्री.

## २०२६ चे वि.स.वि. क्र. ३०.– भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

**(भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील उतारे.)**

**(२०२३ चा ४५)**

**१. ते ७१.** * * * *

**७२.** (१) कलम ६४ किंवा कलम ६५ किंवा कलम ६६ किंवा कलम ६७ किंवा कलम ६८ किंवा कलम ६९ किंवा कलम ७० किंवा कलम ७१ या अन्वये ज्या व्यक्तीविरुद्ध अपराध घडल्याचे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसा अपराध करण्यात आला असल्याचे आढळून आले असेल त्या कोणत्याही व्यक्तीची (या कलमात यात यापुढे जिचा निर्देश, "पीडित व्यक्ती" असा केला आहे) ओळख ज्याद्वारे उघड होऊ शकेल ते नाव किंवा कोणताही मजकूर, जो कोणी, छापील किंवा प्रसिद्ध करील, त्याला, जी दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कोणत्याही एका वर्णनाची कारावासाची शिक्षा होईल, आणि तो, द्रव्यदंडास देखील पात्र असेल. विवक्षित अपराधांच्या पीडितेची ओळख उघड करणे, इत्यादी.

(२) * * * *

**७३. व ७४.** * * * *

**७५.** (१) जो पुरुष, पुढीलपैकी कोणतीही कृती करील, तो, लैंगिक छळवणुकीच्या अपराधाबद्दल दोषी असेल :– लैंगिक छळवणूक.

(एक) शरीरास स्पर्श करणे आणि अवांछनीय व व्यक्त लैंगिक संबंधासाठी लगट

करण्याचा प्रयत्न करणे; किंवा

(दोन) लैंगिक मेहेरनजर करण्याची मागणी किंवा विनंती करणे; किंवा

(तीन) एखाद्या स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिला संभोगदर्शक चित्रणे दाखविणे; किंवा

(चार) अश्लीलतापूर्ण शेरेबाजी करणे.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या खंड (एक) किंवा खंड (दोन) किंवा खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध करील, त्याला, जी तीन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा, किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल; अथवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) * * * *

**७६. व ३५८.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३०. ]**

**[ भारतीय न्याय संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**

मुख्यमंत्री.]

**जितेंद्र भोळे,**

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.